मूल्य १ रु.
http://lokadesh.in
# लोकादेश
महाराष्ट्र शासन जाहिरात मान्यताप्राप्त साप्ताहिक
मुख्य संपादक : साजीद बडगुजर
किनवट, वर्षे १७ वे, अंक ३६ वा, सोमवार, दि.०२ सप्टेंबर २०२४, पाने ०४
RNI No. MAHMAR/2007/20732
Post Regd.NO G-2/RNP/NND-323/2023-2025



मराठवाडा आणि विदर्भाच्या सीमेवर पैनगंगा नदी वरील किनवट तालुक्यात सहस्त्रकुंडचा मनमोहक धबधब्याच्या सर्व धारा भरुन वाहत आहे छायचित्रकार विजय होकर्णे यांनी टीपलेले छायाचित्र.

# नांदेड जिल्ह्यामध्ये अतिवृष्टी; नागरीकांना सतर्कतेचा इशारा

## १२ जनावरांचा मृत्यू ; २५ घरांची पडझड
## पाऊस थांबताच शेती व अन्य पंचनामे करणार

**नांदेड दि. १ : नांदेड जिल्ह्यामध्ये गेल्या ३६ तासांमध्ये पावसाचा जोर कायम असून अजूनही पाऊस सुरू आहे. जिल्ह्यातील २६ मंडळामध्ये अतिवृष्टी झाली असून जिल्ह्यातील सर्व प्रकल्पातून पाणी सोडले जात आहे. नदी नाले ओसंडून वाहत असून नागरिकांनी सतर्क राहण्याचा इशारा जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिला आहे. जिल्ह्यात अतिवृष्टीमध्ये १२ जनावरे मृत्युमुखी पडली असून २१ घरांची अंशतः पडझड झाली आहे.**

आपत्ती व्यवस्थापन, कृषी, पाटबंधारे, महसूल व पोलीस विभाग स्थितीवर लक्ष ठेवून असून ज्या ठिकाणी मदतीची आवश्यकता आहे. त्या ठिकाणी आवश्यक साधनसामुग्रीसह तैणात राहण्याची सूचना बचाव पथकांना केली आहे. एनडीआरएफचे पथक तैणात असून कोणत्याही आपत्कालीन स्थितीमध्ये नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. दरम्यान महसूल विभागाच्या सतर्कतेने मुदखेड तालुक्यात पुलाव अडकलेल्या नागरिकाची सुटका करण्यात आली आहे.

शनिवारी सकाळी दहा वाजता पासून रविवारी रात्री ७ वाजेपर्यंत पावसाची कुठे दमदार अतिवृष्टी तर कुठे रिपरिप सुरू आहे. सकाळी १० पर्यंत आलेल्या आकडेवारी नुसार जिल्ह्यातील ६३ मंडळांपैकी २६ मंडळांमध्ये ६५ मिली लिटर पेक्षा अधिक पाऊस झालेला आहे. किनवट सारख्या तालुक्यात मोठ्या प्रमाणात मुसळधार पाऊस झाला. रात्री उशिराही पाऊस सुरु आहे. त्यामुळे नदी नाल्यांच्या पाणीपात्रामध्ये वाढ झाली असून नागरिकांनी धोक्याच्या ठिकाणी जाणे टाळावे असेही जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**पाऊस थांबल्यावर पंचनामे**

अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानाच्या पंचनामा पाऊस थांबल्यानंतर करण्यात यावा असे निर्देश प्रशासनाने दिले आहे. प्राथमिक अंदाजानुसार व आकडेवारीनुसार गेल्या २४ तासात झालेल्या अतिवृष्टी मध्ये सहा मोठी दुधाळ जनावरे, पाच छोटी दुधाळ जनावरे एक बैल मृत्युमुखी पडले आहे तर २१ घरांची अंशतः पडझड झाली आहे.

जिल्ह्यामध्ये २४ तासात सर्वाधिक पाऊस किनवट तालुक्यात झाला आहे. दहा वाजेपर्यंत १३६ मिलिमीटर पाऊस तालुक्यात झाला. तालुक्याच्या सिंदगी,उमरी बाजार व किनवट या मंडळात पावसाचा जोर अधिक आहे. किनवट पाठोपाठ हिमायतनगर, माहूर, हदगाव, भोकर, अर्धापूर, मुदखेड, या तालुक्यांमध्ये सध्या पाऊस जोरदार सुरू आहे. नागरिकांनी नाले, ओढे, तलावाच्या भागात जाण्याचे आज टाळावे असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**पूरनियंत्रणाची सज्जता**

जिल्हयातील प्रकल्पामध्ये सततच्या पावसामुळे वाढ होत असून नदी धरणे व बंधा-यांपुढील नदीपात्रा नजीक राहणा-या नागरिकांनी सतर्कता बाळगण्याचे आदेश देण्यात आले आहे.गोदावरी नदीवरील दिग्रस बंधा-याचे दोन दारे उघडण्यात आली आहे. अंतेश्वर बंधा-याची सर्व दारे उघडण्यात आली आहे.पूर्णा नदीवरील सिध्देश्वर धरणाची दारे उघडली आहे. त्यामुळे विष्णुपुरी धरणामध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याचा प्रवाह येत असून या बंधा-याचे देखील चार दरवाजे उघडण्यात आले आहे. विष्णूपुरी धरणाचे आणखी काही दारे उघडली जाऊ शकतात. त्या खालच्या आमदुरा धरणाचे १६ पैकी ११ दरवाजे उघडण्यात आले आहे. त्या खालील बडेगाव धरणाचेही नऊ दरवाजे उघडण्यात आले आहे.

ईसापुर धरणाच्या खालील बाजूस अतिवृष्टी होऊन पैनगंगा नदीपात्रात गंभीर पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. ईसापुर धरणाच्या पाणलोट क्षेत्रातून येणारा पाण्याचा येवा सध्या कमी झाला आहे.त्यामुळे धरणा खालील पूरस्थिती नियंत्रित करणे शक्य व्हावे याकरीता सायंकाळी ६ वाजता ईसापुर धरणातून पाणी सोडण्या बाबतचा निर्णय स्थगित करण्यात आला आहे.

धरणामध्ये असणारा सध्याचा साठा. धरणामध्ये येणारा पाण्याचा नवीन प्रवाह. या महिन्यात धरणामध्ये ठेवायचा जलसाठा हे लक्षात घेऊन प्रकल्पाचे दरवाजे उघडण्यात येतात. त्यामुळे अतिवृष्टी झाल्यास अधिकअतिवृष्टी झाल्यास अधिक प्रमाणात पाणी सोडले जाऊ शकते. त्यामुळे या सर्व प्रकल्पाच्या खालील बाजूस असणा-या नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. जिल्ह्यातील अंतर्गत वाहणा-या सर्व नद्या तुडुंब वाहत असून नागरिकांनी आवश्यकता नसेल तर पुलावरून पाणी असल्यास पूल ओलांडू नये असे आवाहन करण्यात आले आहे.

**किनवट, हिमायतनगरमध्ये अधिक पाऊस**

**प्रकल्प भरले; धरणाखालील नागरीकांनाही इशारा**



## पावसामुळे किनवट तालुक्यात मोठे नुकसान



**पावसाळ्याला सुरुवात झाल्यापासून शनिवारी दि.३१ पहिल्यांदाच झालेल्या जोरदार पावसामुळे किनवट - उमरखेड रस्त्यावरील पैनगंगा नदी दुथडी भरून वहात आहे.पावसाचा जोर कायम राहिल्यास पुराची शक्यता निर्माण झाली आहे. श्रावणमासाच्या सुरुवातीपासूनच ऑक्टोबर हीटसारखा उकाडा जाणवत असताना शनिवारी रात्री किनवट तालुक्यात मेघगर्जनेसह जोरदार पावसाला सुरुवात झाली.पहाटेपर्यंत दमदार बरसलेल्या पावसाने रविवारी सकाळी पुन्हा हजेरी लावली.पावसाळ्याला सुरुवात होवून २ महिन्याचा कालावधी लोटत असताना शनिवारी रात्री बरसलेल्या मुसळधार पावसामुळे शहरालगतच्या पैनगंगेसह परिसरातील छोटे - मोठे नाले,नद्या दुथडी भरून वहात आहेत.पावसाने विश्रांती घेतली नसल्याने पुराची शक्यता असल्याने नदीकाठच्या लोकांनी सतर्क राहावे,असे आवाहन प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.दरम्यान,किनवट - माहूर तालुक्यात ढगफुटीसदृश झालेल्या पावसामुळे शेतीचे नुकसान झाले आहे.या नुकसानीची त्वरित पाहाणी व पंचनामे करण्याची सूचना आमदार भीमराव केराम यांनी महसूल प्रशासनाला दिली आहे.**

# किनवट तालुक्यातील आदिम कोलाम जमातीच्या समास्यांचे केले जातेय निराकरण

## तालुक्यातील नऊ आदिवासी गावात शिबिर लावून दिल्या जात आहे योजनांचा लाभ





**लोकादेश न्यूज, किनवट ता.३० : किनवट तालुक्यातील आदिम जमातींच्या नऊ गावांमध्ये प्रधानमंत्री जनमन योजनेअंतर्गत सहा दिवसीय विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिरात लोकांना शासकीय योजनांच्या माहितीसह इतर अनेक सुविधांची माहिती जागेवरच दिली जात असून, कोलाम या आदिम जमातीच्या सर्व मूलभूत समस्या सोडविण्यावर भर दिला जात असल्याची माहिती, येथील सहा.जिल्हाधिकारी तथा प्रकल्पाधिकारी कावली मेघना(भाप्रसे) यांनी दिली.**

प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान योजने अंतर्गत आदिम जमातीच्या लोकांना आवश्यक प्रमाणपत्रे व सेवा बाबत जागरुकता निर्माण करुन, त्यांना जलदरित्या प्रमाणपत्रे वितरीत करण्यासाठी प्रशासनाकडून प्राधान्याने व सक्रियतेने कार्यवाही करण्याबाबत शासनस्तरावरुन सुचित करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने येथील सहा.जिल्हाधिकारी तथा प्रकल्पाधिकारी कावली मेघना (भाप्रसे) यांनी केलेल्या सूक्ष्म नियोजनानुसार तालुक्यातील कोलामखेडा, जावरला, काझीपोड, मांडवी, जवरला, नागापूर, मांडवा कि.,तलाईगूडा व शिवरामखेडा या नऊ गावांमध्ये दि.२९ ऑगस्ट ते ०३ सप्टेंबर या कालावधीत विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. आदिम जमातीच्या (कोलाम) नागरीकांना लाभ देण्याकरिता प्रत्येक कॅम्पसाठी अधिकारी व कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आली असून, शिबिर यशस्वी करण्यासाठी आवश्यक ते निर्देश देण्यात आले आहेत. उपरोक्त शिबिर असलेल्या नऊ गावांसह त्या अंतर्गत बेल्लोरी कि.,आनंदवाडी, पळशी डाग, लिंगी, शिरपूर, मोहाडा, पळशी, पाटोदा बु, पिंपळशेंडा, सोनापूर, शिवशक्तीनगर, घोगरवाडी, पिंपळगाव कि., लिमगुडा, कोलमगुडा, कोलमपोड या गावातील आदिम जमातीचे नागरिक या योजनांचा लाभ शिबिरांमध्ये घेत आहेत.

या शिबिरांत आदिम जमातींना जन-धन योजनेअंतर्गत बँक खाती उघडण्याची परवानगी दिली जात आहे. याशिवाय आयुष्मान कार्ड, आधार कार्ड, आवश्यकतेनुसार जात प्रमाणपत्रासह इतर प्रकारच्या सुविधा जागेवरच उपलब्ध करून देण्यात येत आहेत. यासोबतच आदिम जमातींच्या आवश्यकतेनुसार त्यांच्या आरोग्य चाचण्याही केल्या जात आहेत. वनहक्क कायद्यांतर्गत कोणतेही प्रकरण प्रलंबित असल्यास तातडीने आवश्यक ती कार्यवाही करण्यात येणार आहे. या शिवाय इतरही अनेक सुविधांसह शासनामार्फत राबविल्या जाणा-या विविध प्रकारच्या योजनांचीही ग्रामस्थांना जाणीव करून दिली जात आहे. उपविभागीय कार्यालयाकडून या संपूर्ण योजनेवर बारीक लक्ष ठेवले जात असून, सर्व आदिवासी गावांमध्ये नियोजित वेळेपूर्वी शिबिरांचे आयोजन अनिवार्यपणे करण्याच्या सूचना सर्व अधिका-यांना देण्यात आल्या आहेत. उपविभागीय कार्यालय,किनवट आणि एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, यांच्या संयुक्त विद्यमाने जनमन योजनेंतर्गत हे शिबिर आयोजित केले जात असून, आदिम जमातींसाठी ते निश्चितच फायदेशीर ठरणार आहे. आदिम जमातींसाठी प्रधानमंत्री जनमन योजना वरदानस्वरूप ठरवून यशस्वी करण्यासाठी तहसीलदार शारदा चौंडेकर यांचेसह नायब तहसीलदार रामोर मुंडे व व्ही.पी.राठोड, गटविकास अधिकारी पी.जी.वैष्णव, मुख्याधिकारी एम.एम.काकडे यांचेसह त्यांचे सहकारी कृषी मंडळ अधिकारी बी.आर. मुनेश्वर, शिवदास पाटणे, विनोद सिंगेवार, यु.जे.नखाते, अभियंता भालेराव, सातुरवार, जीवन कांबळे, एम.वांगीकर, सचिन भालेराव विस्तार अधिकारी व्ही.जी.वाघमारे, के.एस.गायकवाड आदी टोकाचे प्रयत्न करीत परिश्रम घेत आहेत.

# विधानसभेसाठी जिल्ह्यात २७.५१ लक्ष मतदार

## मतदार यादीच्या दुस-या विशेष संक्षिप्त पुनरिक्षणानंतर ३० हजार मतदार वाढले

नांदेड, दि. ३१ ऑगस्ट : २० ऑगस्टपर्यंतच्या मतदार यादीच्या दुस-या विशेष संक्षिप्त पुनरिक्षणाच्या कार्यक्रमानंतर नांदेड जिल्ह्यामध्ये ३० हजार २१८ मतदारांची वाढ झाली आहे. काल ३० ऑगस्ट रोजी यासंदर्भातील आकडेवारी जिल्हा निवडणूक कार्यालयाने जाहीर केली आहे.

नांदेड जिल्ह्यातील किनवट,हदगाव,भोकर, नांदेड उत्तर, नांदेड दक्षिण, लोहा, नायगाव, देगलूर व मुखेड या नऊ विधानसभा मतदारसंघासाठी मतदार यादी तयार झाली आहे. जिल्ह्यामध्ये नऊ मतदारसंघात एकूण पुरुष मतदारांची संख्या १४ लक्ष १४ हजार ७२७ आहे तर महिला मतदारांची संख्या १३ लक्ष ३६ हजार ७४० आहे तृतीयपंथीयांची संख्या १७१ आहे.

नांदेड जिल्ह्यातील नऊ विधानसभा मतदार संघाच्या मतदारांची अंतीम यादी ३० ऑगस्ट २०२४ रोजी प्रसिध्द झाली आहे. या नऊ मतदार संघातील मतदार संख्या पुढीलप्रमाणे आहे. ८३ -किनवट मतदार संघ एकूण २ लाख ७४ हजार ६३८ तर ८४- हदगाव मतदारसंघात २ लाख ९५ हजार ०८३, ८५ -भोकर मध्ये २ लाख ९९ हजार २२८ मतदाराची संख्या आहे, ८६ -नांदेड उत्तर मतदार संघात ३ लाख ५४ हजार ८०० तर ८७- नांदेड दक्षिण मतदार संघात ३ लाख १३ हजार ६५३, ८८-लोहा २ लाख ९७ हजार ७३८ तर ८९ -नायगाव मतदार संघात ३ लाख ६ हजार ३४०, ९०- देगलूर मतदार संघात ३ लाख ८ हजार ३९० व ९१-मुखेड मतदार संघात ३ लाख ०१हजार ७६८ मतदार संख्या आहे. नऊ विधानसभा मतदार संघात एकूण २७ लाख ५१ हजार ६३८ मतदारांची संख्या असून यात १४ लाख १४ हजार ७२७ पुरुष तर १३ लाख ३६ हजार ७४० महिलांचा तर १७१ तृतीयपंथीयाचा समावेश आहे. ६ ऑगस्ट नंतरच्या विशेष नोंदणी अभियानात ३० हजार २१८ मतदार संख्या वाढली आहे.

### विधानसभेसाठी ईव्हीएम मतदान यंत्रे तयार

नांदेड, दि ३१ ऑगस्ट : राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीसाठी आवश्यक असणा-या मतदार यंत्रांची तपासणी करून ते मतदानासाठी सज्ज करण्यात आले आहेत.

दिनांक १ ऑगस्ट ते २८ ऑगस्ट २०२४ या दरम्यान मतदान यंत्रे तयार करण्याचे कामकाज महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे गोदाम ,ग्क्ष्क्क, ढवळे कॉर्नर नांदेड येथील जिल्हा वेअर हाऊस येथे चालू होते. सदरील कामकाज दिनांक २८ ऑगस्ट २०२४ रोजी पूर्ण पूर्ण करण्यात आले असून आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने BU 7010, CU3922, VVPAT 4231 इतके मतदान यंत्रे जिल्ह्यातील ९ विधानसभा मतदारसंघासाठी तयार करण्यात आली आहेत.

सदरील कामकाज जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिजीत राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी राजकुमार माने व त्यांच्या अधिनस्त अधिकारी कर्मचारी यांनी पार पाडले.त्यामध्ये नायब तहसीलदार भोसीकर मुखेड, नायब तहसीलदार विजयकुमार पोटे, भोकर नायब तहसीलदार सतीश कुलकर्णी, नायगाव नायब तहसीलदार बोलेलो त्याचप्रमाणे इतर विभागाचे २० ते २५ कर्मचारी व बेल कंपनीचे १६ इंजिनिअर आणि दररोज ३० ते ४० हमाल यांच्या सहकार्याने सदर मतदान यंत्रे तयार करण्याचे एफएलसीचे कामकाज यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आलेले आहे. सदरची मतदान यंत्रे आगामी विधानसभा निवडणुकीसाठी तयार करण्यात आली आहेत.

# ग्रामीण भागाचा कायापालट करणारी ‘महात्मा गांधी रोजगार हमी योजना’

ग्रामीण भागातील नागरिकांच्या हाताला काम देणे आणि त्या माध्यमातून ग्रामीण भागाचा विकास करण्याच्या दुहेरी उद्देशाने राज्यात ‘महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना’ राबविण्यात येते. या योजनेच्या माध्यमातून गावा गावातील सार्वजनिक विकासाची विविध कामे हाती घेतली जातात. तसेच शेतक-यांना लाभ होणा-या अनेक योजना या महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून राबवल्या जात आहेत. त्यामुळे या योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा कायापालट होत असल्याचे चित्र दिसते आहे.

महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत सन २०२३-२४ मध्ये १९ लाख ५० हजार कुटुंबातील ३२ लाख ५० हजार मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच योजनेंतर्गत ७०० लाख मनुष्यदिवसांची निर्मिती करण्यात आली आहे. त्यामध्ये महिलांचा ४४ टक्के इतका वाटा आहे. आतापर्यंत २ हजार ९६३ कोटी इतका खर्च या योजनेत झाला असून त्यापैकी १ हजार ८५० कोटी इतका खर्च अकुशल मजुरीवर झाला आहे. महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या सलग शेतावर, शेताच्या बांधावर व पडीक जमीनीवर अमृत महोत्सवी फळझाड लागवड, फुलपीक लागवड कार्यक्रम राबवण्यात येतो. या कार्यक्रमात अल्प भूधारक शेतक-यांचा समावेश आहे. या कार्यक्रमात पूर्वी समाविष्ट असलेल्या आंबा, काजू, नारळ, पेरू, डाळींब, संत्रा, मोसंबी, कागदी लिंबू, सिताफळ, आवळा, चिंच, जांभूळ, फणस, कोकम, अंजिर, चिकू या फळझाडांसोबतच केळी, ड्रॅगनफ्रुट, व्हाकॅडो, द्राक्ष या फळझाडांचा आणि सोनचाफा फुलझाडे तसेच लवंग, दालचिनी, मिरी आणि जायफळ या मसाला पिकांचाही समावेश करण्यात आला आहे.

फळबाग लागवडीचा कार्यक्रम राबवण्यात येत असलेल्या अडचणींचा विचार करून क्षेत्रीय स्तरावर योजना प्रभावीपणे राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच लाभार्थ्यांना ऑनलाईन मागणी करण्याची सुविधा दिल्यामुळे योजना पारदर्शकपणे राबवण्यात येत आहे.

मनरेगा अंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांना सिंचन विहिरींचा लाभ देण्यात येतो. सिंचन विहिरीच्या खाचाची मर्यादा ४ लाख रुपयापर्यंत वाढवण्यात आली आहे. तसेच किमान १५० मीटरची अट रद्द केल्यामुळे अनेक




शेतक-यांना याचा लाभ झाला आहे.

नागपूर विभागातील गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, नागपूर आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये सिंचन विहिरींचा धडक कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. तसेच मनरेगा अंतर्गत आता कांदा चाळ निर्मितीसही मान्यता देण्यात आली आहे.

शाळांच्या सुरक्षेचा विचार करता शाळांना संरक्षण भिंत असणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने शाळांना सुरक्षा भिंत बांधण्याचे काम मनरेगा अंतर्गत घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.

मनरेगा अंतर्गत राज्यात मिशन बांबू लागवड कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. यामध्ये राज्यात १० हजार हेक्टर क्षेत्रावर बांबू लागवड करण्याचे उद्दीष्ट ठरवण्यात आले आहे. तसेच यासाठी शेतक-यांना हेक्टरी ७ लाख रुपयांपर्यंतचे अनुदान देण्यात येते. पर्यावरण संरक्षणासोबतच शेतक-यांची आर्थिक स्थिती सुरधारण्यात या मिशन बांबूमुळे हातभार लागणार आहे.

मनरेगा अंतर्गत मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजना राबवण्यात येत आहे. या योजनेमध्ये प्रती किलोमीटर लांबीचा रस्ता मातीकामासह खडीकरणासाठी १५ लाख रुपयांचा निधी तसेच फक्त डांबरीकरणासाठी १३ लाख रुपयांचा निधी दिला जातो. या कामांसाठी अकुशल मजुरीवरील खर्च किमान ३ लाख रुपये व कुशल म्हणजेच साहित्यावरील २ लाख रुपये असा एकूण ५ लाख रुपये खर्च मनरेगा अंतर्गत करणे बंधनकारक आहे. राज्यात मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजनेंतर्गत ५० हजार किलोमीटर लांबीचे रस्ते तयार करण्यात येत आहेत.

भूमिगत पाण्याची पातळी उंचावण्याची गरज लक्षात घेऊन केंद्र शासन पुरस्कृत जनशक्ती अभियान कार्यक्रमांतर्गत ‘कॅच द रेन’ मोहीम राबवण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत पावसाचे पाणी जमिनीत मुरवण्यासाठी लागणारे शोष खड्डे निर्मितीसह इतर जलसंधारणाची कामे मनरेगा अंतर्गत करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. तसेच दुष्काळी परिस्थितीत चारा टंचाईवर उपाययोजना म्हणून गायरान, वैयक्तिक जमिनीवर मनरेगा अंतर्गत चारा पिकांची लागवड करण्यात येते.

एकूणच राज्याच्या ग्रामीण भागाचा विकास करणे आणि शेतक-यांना शाात आर्थिक स्त्रोत निर्माण करून देण्या-या विविध योजना मनरेगा अंतर्गत राबवण्यात येत असून या योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा कायापालट होत आहे. गेल्या दोन वर्षात मनरेगाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर ग्रामीण, शेत, पाणंद रस्त्यांची निर्मिती झाली आहे. त्याशिवाय सिंचन विहीरी, फळबाग लावगड या माध्यमातून शेतक-यांना आर्थिक स्थिरता मिळवून देण्यात आली आहे. मिशन बांबू लागवडीच्या माध्यमातून शेती क्षेत्रात क्रांती होणार आहे. शेतीची कामे नसणा-या काळात शेतक-यांच्या हाताला काम देऊन त्यांना उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण करण्याचे काम महात्मा गांधी रोजगार हमी योजना ग्रामीणच्या माध्यमातून होत आहे.

हेमंतकुमार चव्हाण, विसंअ

# मराठा सेवा संघ वर्धापन दिनाच्या आपल्या सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा!

१ सप्टेंबर १९९० रोजी युगपुरुष, एडवोकेट पुरुषोत्तमजी खेडेकर साहेबांनी काही निवडक अधिकारी - कर्मचा-यांना सोबत घेऊन अकोला येथे मराठा सेवा संघ या कर्मचा-यांच्या सामाजिक, वैचारिक संघटनेची स्थापना केली. १९९० साली मराठा समाजाची परिस्थिती पाहता मराठा समाज अनिष्ट चालीरीती रूढी प्रथा परंपरेमध्ये अडकून पडला होता . अज्ञान, अंधश्रद्धा, कर्मकांडामुळे मराठा समाजात सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय मागासले पण आले होते. मराठा समाज ब-याच प्रमाणात व्यसनाधीनतेच्या आहारी गेला होता. प्रत्येक राजकीय पक्षाचे नेते आपला राजकीय स्वार्थ साधण्यासाठी मराठा तरुणांना जातीय - धार्मिक दंगली घडविण्यासाठी वापरत होते . मराठा समाजात कुणबी, कुणबी मराठा, मराठा, पाटील, देशमुख अशा प्रकारचा भेदभाव केला जात होता. हिंदू - मुस्लिम दंगली घडवून आणण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांचा चुकीचा इतिहास सांगितला जात होता. अशा परिस्थितीत युगपुरुष पुरुषोत्तमजी खेडेकर साहेबांनी स्वराज्य संकल्पिका राष्ट्रमाता, राजमाता जिजाऊ यांना प्रेरणास्थानी माणून, तथागत गौतम बुद्ध, वर्धमान महावीर, बळीराजा, संत चार्वाक, महात्मा बसवेर, चक्रधर स्वामी, वारकरी संप्रदायातील संत नामदेव महाराज पासून ते संत तुकाराम महाराजां पर्यंत सर्व संत तसेच संत कबीर, संत रविदास , छत्रपती शिवराय, राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले , आरक्षणाचे जनक छत्रपती शाहूजी महाराज, विरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, राष्ट्रसंत गाडगेबाबा, कर्मवीर भाऊराव पाटील यांसारख्या महामानवांच्या समतावादी, मानवतावादी, विज्ञानवादी विचारावर आधारित समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी मराठा सेवा संघ या वैचारिक संघटनेची स्थापना केली. राजमाता जिजाऊंचे जन्मस्थळ असलेल्या सिंदखेड राजा येथे १९९३ पासून मोठ्या उत्साहात जिजाऊ जन्मोत्सव साजरा करण्यात येऊ लागला. या ठिकाणी महाराष्ट्रातूनच नव्हे तर देशभरातून लाखो समाज बांधव जिजामातेस अभिवादन करण्यासाठी येऊ लागले. हजारो पुस्तकांचे स्टॉल लागू लागले. मराठा समाज बांधव लाखो रुपयांच्या पुस्तकांची खरेदी विक्री लागले . पुस्तकेवाचून मराठा समाजातील तरुणांचे मन, मनगट, मेंदू, मनका सशक्त होऊ लागले. ॲड.पुरुषोत्तमजी खेडेकर साहेब, डॉ. आ.ह.साळुंखे सर, प्रा. मा.म. देशमुख सर, प्रा.जेमिनी कडू सर , चंद्रशेखर शिखरे सर, गंगाधर बनबरे, श्रीमंत कोकाटे, प्रदीप दादा साळुंखे , डॉ. बालाजी जाधव, संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष मनोज आखरे, ह.भ.प.मधुकर महाराज बारूळकर, मनोरंजनातून प्रबोधन करणारे राष्ट्रसंत तुकडोजी



**प्रा.दगडू भरकड**
तालुका अध्यक्ष,
मराठा सेवा संघ,
किनवट
जि. नांदेड
**मो.क्र.९६२३६७०२१२**

महाराज व गाडगेबाबा यांचा वैचारिक वारसा चालविणारे सप्त खंजिरी वादक सत्यपाल महाराज व त्यांचे शिष्य संदीप पाल महाराज, शिवशाहीर राजेंद्र खुडुसकर, शिवशाहीर भगवान गावंडे यांसारख्या लेखक ,वक्ते व प्रबोधनकारांच्या माध्यमातून बहुजन महामानवांचा खरा इतिहास तुमच्या आमच्या पर्यंत पोहोचला. मराठा सेवा संघाच्या पुढाकाराने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या तारखेचा वाद मिटला. जगभरात १९ फेब्रुवारी या दिवशी छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येऊ लागली. जय जिजाऊ जय शिवराय म्हणून मराठा समाज बांधव एकमेकास अभिवादन करू लागले. १९९६ पासून १९ तारखेस शिवनेरीवर शिवजन्मोत्सव व ६ जून रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्यभिषेक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येऊ लागला. मराठा समाजातील तरुणांना सकारात्मक दिशा देण्यासाठी संभाजी ब्रिगेड ही संघटना स्थापन केली. सामाजिक कार्यात महिलांचा सहभाग असावा यासाठी जिजाऊ ब्रिगेड ही महिलांची संघटना स्थापन केली. विद्यार्थ्यांसाठी वीर भगतसिंग ही संघटना स्थापन केली. पंजाबराव देशमुख शिक्षक परिषद, राजर्षी शाहू महाराज शिक्षण परिषद, पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील कृषी परिषद, तानुबाई बिरजे पत्रकार परिषद, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व्यसनमुक्ती कक्ष , राष्ट्रसंत गाडगेबाबा प्रबोधन कक्ष यासारख्या ३३ कक्षाच्या माध्यमातून समाजाला गतिशील करण्याचे काम मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष युगपुरुष पुरुषोत्तम खेडेकर साहेबांनी केले आहे. मराठा समाजास विकसित करायचे असेल तर पुढील पाच सत्ता आपल्या ताब्यात असल्या पाहिजे असे मराठा सेवा संघाचे मत आहे. पहिली शिक्षण सत्ता आज छत्रपती शिवाजी महाराज असते तर त्यांनी आपल्या हातात ढाल तलवार देण्याच्या ऐवजी पेन आणि पुस्तक दिले असते. गड किल्ले जिंकण्याच्या आणि बांधण्याच्या ऐवजी एमपीएससी, यूपीएससी स्पर्धा परीक्षा केंद्र सुरू केली असती. इंजीनियरिंग, मेडिकल, आयआयटी, आय आय एम सारख्या संस्था उभारल्या असत्या. आज शैक्षणिक संस्था आपल्या आहेत शिकवणारे शिक्षक आपले आहेत शिकणारी विद्यार्थी आपले आहेत पण त्यांना शिकविला जाणारा अभ्यासक्रम हा सदाशिव पेठेतील आहे. त्यामुळे बहुजन समाजातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होईल अशा स्वरूपांचा अभ्यासक्रम असावा. त्यासाठी अभ्यासक्रम नियोजन मंडळात आपल्या बहुजनांचे विचारवंत, शिक्षण तज्ञ असावेत. प्रशासनात मोठ्या पदावर मराठा समाजातील तरुण असावेत. यासाठी शिक्षण सत्ता ही आपल्या हातात पाहिजे. दुसरी सत्ता ही राजसत्ता आहे. सर्वच लोक म्हणतात आमदार, खासदार, मंत्री, मुख्यमंत्री, केंद्रात मंत्री हे मराठा समाजातील आहेत. मराठा समाजाच्या हातात सत्ता आहे. खरेच असे असते तर आज २०२४ साली गरजवंत मराठा समाजास ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मागण्याची वेळ आली नसती. १९९४ सालीच मराठा समाजास आरक्षण मिळाले असते. पण तसे झाले नाही याचा अर्थ हे सर्व आमदार खासदार मंत्री हे पक्षाचे आहेत गोरगरीब मराठा समाजाचे नाहीत. त्यामुळे गोरगरीब समाजातून ज्याच्याकडे सामाजिक दायित्वाची भावना आहे, सर्व समाजाच्या, राष्ट्राच्या हिताचे निर्णय घेऊ शकतो, शेतक-यांचे प्र न सोडू शकतो ,माता भगिनींच्या इज्जतींचे संरक्षण करू शकतो, तरुणांना मोठ्या प्रमाणात रोजगार देऊ शकतो , जातीय - धार्मिक सलोखा निर्माण करून राष्ट्रीय एकात्मता निर्माण करू शकतो अशा व्यक्तींनाच सत्तेमध्ये पाठवले पाहिजे. त्यामुळे सामान्यांच्या प्र नांची जाण असलेले सामान्यातून नेतृत्व निर्माण झाले पाहिजे ही मराठा सेवा संघाची भूमिका आहे. तिसरी सत्ता ही अर्थसत्ता आहे. अर्थाशिवाय आपल्या जीवनाला अर्थ नाही. त्यामुळे बुटाच्या पॉलीस पासून तर डोक्याच्या मालिश पर्यंत हाताला मिळेल ते काम मराठा तरुणांनी केले पाहिजे. गाव सोडून शहराकडे गेलो पाहिजे. शिक्षण - व्यवसाय - नोकरीसाठी देश विदेशात गेलो पाहिजे. शेतात काय पिकते यापेक्षा बाजारात काय विकते यानुसार आपण उत्पादन केले पाहिजे हे विचार मराठा सेवा संघाने दिले. आज किती उद्योग - व्यवसायात मराठा समाज बांधव आहेत त्याचा विचार करावा. काही मूठभर मराठा समाज बांधवांकडे कारखाने आहेत म्हणून सर्व मराठा समाज श्रीमंत होत नाही. गरिबीत जन्म घेणे हा गुन्हा नाही पण गरिबीत मरणे हा मात्र गुन्हा आहे असे खेडेकर साहेब म्हणतात. चौथी सत्ता आहे ती धर्मसत्ता. पूजा पाठ होम हवन उपवास यज्ञ यात गुरफटून न बसता प्रयत्नवादी झालो पाहिजे. आपली श्रद्धा असेल तर मध्यस्थ्याशिवाय आपण स्वतः पूजा अर्चा करू शकतो. समतेवर आधारित शिवधर्माची स्थापना करण्यात आली. शिवधर्मानुसार आपण आपले विधी संपन्न केले पाहिजे. असे केल्यास लाखो करोडो रुपयांची मराठा समाजाची बचत होईल. हा विचार मराठा सेवा संघाने दिला. पाचवी सत्ता आहे ती प्रचार प्रसार माध्यमांची. प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया मराठा समाजाकडे असावा. मनुवाद्याकडे असलेल्या प्रचारप्रसार माध्यमातून राईचा पर्वत करतात आणि पर्वताची राई करतात. आपली विचारधारा लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रचार प्रसार माध्यमे ही आपल्याकडे असले पाहिजे. आपल्याला सामाजिक सांस्कृतिक बदल घडवून आणायचा असेल तर या पाच सत्ता आपल्याकडे असाव्यात अशी मराठा सेवा संघाची भूमिका आहे. महापुरुषांच्या जयंतीनिमित्त डीजेच्या तालावर नाचण्यापेक्षा वैचारिक प्रबोधन पर कार्यक्रमाचे आयोजन मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड मुळेच केले जात आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा लढा हा मुस्लिम धर्माच्या विरोधात नसून अन्याय अत्याचाराच्या विरोधात न्याय समता प्रस्थापित करण्यासाठीचा होता. छत्रपती शिवरायांच्या मावळ्यात अंगरक्षक सिद्धी इब्राहिम, वकील काझी हैदर, आरमाराचा सुभेदार दर्यासारंग, आरमार प्रमुख दौलत खान ,तोफखाना प्रमुख इब्राहिम खान, अफजल खान भेटीच्या वेळी वाघ नखे तयार करून देणारा रणदुल्ला खानचा मुलगा रुस्तुमे जमान, आग्रा भेटीच्या वेळी आपल्या जीवाची परवा न करता छत्रपती शिवाजी महाराजांची सुटका करण्यासाठी मदत करणारा मदारी मेहतर , छत्रपती शिवाजी महाराजांचे १६६८ साली चित्र काढणारा मीर महंमद हे मुस्लिम मावळे होते हा खरा इतिहास जगासमोर आणला. शेतक-यांच्या पिकाचे रक्षण, माता भगिनीच्या इज्जतीचे संरक्षण भिन्न जाती धर्मीयांचा आदर ही छत्रपती शिवरायांची त्रिसूत्री होती. तसेच बहुजन महामानवांच्या विचारांची पेरणी मराठा सेवा संघ संभाजी ब्रिगेडचे हजारो लेखक, वक्ते प्रबोधन पर कार्यक्रमाच्या माध्यमातून करू लागले. त्यामुळे सामाजिक सलोखा निर्माण करण्यास मदत झाली. आज मराठा हा कुणबी मराठा असल्याने ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे या मागणीसाठी आंदोलन सुरू आहे . या मागणीची मूळ सुरुवात मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तमजी खेडेकर साहेबांनी १९९० पासून केली होती. त्यासाठी आंदोलने केली, निवेदने दिली. मराठा समाजातील अधिकारी कर्मचा-यांनी सामाजिक व राष्ट्रीयत्वाची भावना जोपासत समाज व राष्ट्र विकासासाठी पाठीमागे वळून बघितले पाहिजे. समाजाला व राष्ट्राला सकारात्मक व विधायक दिशा देण्याचं काम करावे. तसेच समाज व राष्ट्रसमोरील ज्या समस्या आहेत त्या सोडविण्यासाठी सतत प्रयत्नरत असावे. संततीसाठी संपत्ती मिळवण्यापेक्षा संपत्ती निर्माण करणारी सुसंस्कारित संतती घडवावी. तरुणांना व्यसनमुक्त करण्यासाठी प्रयत्न करावेत. पर्यावरणाचा समतोल टिकून ठेवण्यासाठी वृक्ष लागवड करून त्याचे संरक्षण संवर्धन करावे. जातीय - धार्मिक सलोखा निर्माण करून दंगल मुक्त देश करावा. बहुजन महामानवांच्या विचाराने बहुजन समाजाला जोडण्याचे काम करावे. ही विचारधारा मराठा सेवा संघाची असल्याने आपण सर्व एकत्र येऊन समृद्ध आणि संपन्न भारत निर्माण करण्याचा प्रयत्न करूया.

# खा.वसंतराव चव्हाण यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**नांदेड दि. २७ ऑगस्ट : नांदेडचे खासदार वसंतराव बळवंतराव चव्हाण यांच्यावर आज २७ ऑगस्टला जिल्ह्यातील नायगाव येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी त्यांना राज्य शासनामार्फत श्रध्दांजली अर्पण केली.**



नायगाव येथील चव्हाण कुटुंबीयांच्या स्मशानभूमीमध्ये या भूमीपूत्राला संपूर्ण शासकीय इतमामात अखेरचा निरोप देण्यात आला. पालकमंत्री गिरीश महाजन यांनी पुष्पचक्र अर्पण केले. तसेच शासनामार्फत विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, नांदेड महानगरपालिकेतील आयुक्त डॉ. महेश डोईफोडे, अतिरिक्त जिल्हाधिकारी पी. एस. बोरगावकर यांनी पुष्पचक्र अर्पण केले. पोलीस दलातर्फे हवेत तीन फैरी झाडून अंतिम सलामी देण्यात आली. यावेळी विधानसभेचे विरोधी पक्ष नेते विजय वड्डेटीवार प्रामुख्याने उपस्थित होते.

२६ ऑगस्टला हैद्राबाद येथे उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले. सोमवारी त्यांचे पार्थिव नायगाव येथे पोहोचल्यानंतर त्यांच्या वडिलोपार्जित वाड्यामध्ये अंत दर्शनासाठी ठेवण्यात आले होते. त्यांच्या पार्थिवावर आज त्यांचे मूळ गाव असणा-या नायगाव येथे हजारो चाहत्यांच्या उपस्थितीत अंतीम संस्कार करण्यात आले.चव्हाण कुटुंबांच्या मंदिर परिसरातील स्मशानभूमीत त्यांचे चिरंजिव रवींद्र चव्हाण व रंजीत चव्हाण यांनी भडाग्नी दिला. तत्पूर्वी, त्यांना पोलीस दलाच्या वतीने सलामी देण्यात आली. यावेळी त्यांचा पूर्ण परिवार उपस्थित होता.

नायगाव येथे त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी संपूर्ण राज्यातून तसेच तेलंगाना व कर्नाटक मधील स्नेही मोठ्या संख्येने पोहोचले होते.तर देशातील व राज्यातील राजकीय पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी, लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने पालकमंत्री गिरीश महाजन,राज्याचे विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, लातूरचे खासदार डॉ.शिवाजी काळगे, धुळेच्या खासदार डॉ.शोभा बच्छाव, जालणाचे खासदार कल्याण काळे, परभणीचे खासदार संजय जाधव, खा. रजनीताई पाटील, खा.डॉ.अजित गोपछडे,माजी मंत्री आ.बाळासाहेब थोरात,आ.अमीत देशमुख,आमदार सर्वश्री शामसुंदर शिंदे, राजेश पवार, माधवराव जवळगावकर, बालाजी कल्याणकर, डॉ. तुषार राठोड,धीरज देशमुख,प्रज्ञा सातव ,विक्रम काळे, जितेश अंतापूरकर, मोहन अण्णा हंबर्डे, मेघणाताई बोर्डीकर, माजी खासदार भास्करराव पाटील खतगांवकर, प्रतापराव पाटील चिखलीकर, हेमंत पाटील, सुभाष वानखेडे, माजी केंद्रीय राज्य मंत्री सूर्यकांता पाटील, माजी मंत्री माणिकराव ठाकरे, माजी मंत्री शिवाजीराव मोघे, माजी मंत्री कमलकिशोर कदम ,यांच्यासह राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत श्रद्धांजली सभा झाली.

### वसंतराव चव्हाण यांचा परिचय

खासदार वसंतराव बळवंतराव चव्हाण यांच्या वडीलाचे नाव कै. बळवंतराव अमृतराव चव्हाण होते. त्यांचे वडील बळवंतराव चव्हाण हे देखील विधानसभा व विधान परिषदेवर निवडून आले होते. त्यांचाच राजकीय वारसा वसंतरावांनी पुढे सुरू ठेवला. वसंतरावांचा जन्म दिनांक १५ ऑगस्ट १९५४ रोजी झाला होता. त्यांचे जन्मस्थळ नांदेड जिल्हयातील नायगांव (बा.) आहे. त्यांचे शिक्षण बीकॉम (दुसरे वर्ष) असे होते.

स्व. वसंतराव चव्हाण यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीची सुरुवात ग्रामपंचायत सदस्य सरपंच अशी केली आहे. सन १९७८ ते २००२ पर्यत सलग २४ वर्ष ते नायगाव ग्रामपंचायतचे सरपंच होते. बिलोली सरपंच संघटनेचे अध्यक्ष होते. सन १९९०-९५ या काळात जिल्हा परिषद सदस्य नांदेड. सन २००२ मध्ये जिल्हा परिषदेला दुस-यांदा निवड झाली. स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ नांदेड येथे नांदेड, सन २००२-२००८ विधान परिषद सदस्य होते. २००९-२०१४ या काळात ते राज्याच्या विधानसभेमध्ये विधानसभा सदस्य (अपक्ष) होते. त्यांनी रोजगार हमी योजना महाराष्ट्र राज्य समितीचे सदस्य म्हणूनही पद भूषविले. संसदीय कामकाज पध्दतीचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी युरोपचा अभ्यास दौरा केला. पुन्हा एकदा २०१४-२०१९ या काळात कॉंग्रेस पक्षाचे आमदार म्हणून ते निवडून आले. सदस्य अंदाज समिती महाराष्ट्र राज्य. सन २०१६-२०२२ सभापती कृ.ऊ.बा समिती नायगांव, सन २०२१-२०२३ चेअरमन, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ली आणि २९ फेब्रुवारी २०२४ पासून मुख्य समन्वयक नांदेड ग्रामीण कॉंग्रेसची जबाबदारी त्यांनी घेतली. नायगाव तालुका निर्मितीचे ते शिल्पकार आहेत. ४ जून २०२४ पासून ते कॉंग्रेस पक्षाकडून लोकसभा सदस्य म्हणून निवडून आले. खासदार म्हणून त्यांचे कामकाज नुकतेच सुरू झाले होते. राजकीय कारकीर्दीसोबतच त्यांचो सामाजिक, धार्मिक,सांस्कृतिक, शैक्षणिक कार्यातही खूप मोठा सहभाग होता.

# मी शिवरायांच्या चरणांवर डोकं ठेवून माफी मागतो; पंतप्रधान मोदींनी मागितली माफी

मुंबई- पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदराच्या भूमिपूजनासाठी महाराष्ट्रामध्ये आलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवणमधील राजकोट किल्ल्यावरील महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा कोसळल्याने मी शिवरायांच्या चरणावर डोकं ठेवून माफी मागतो, अशा शब्दांमध्ये प्रतिक्रिया दिली. पीएम मोदी यांनी शिवभक्तांची सूद्धा माफी मागितली. माझे संस्कार वेगळे आहेत, असे म्हणत माफी मागत असल्याचे ते म्हणाले. सावरकरांचा अपमान करूनही माफी मागत नसलेल्यांपैकी



मी नाही. माझे संस्कार वेगळे आहेत, असेही पीएम मोदी म्हणाले. शिवरायांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे लोकार्पण मोदींच्याच करण्यात आले होते. मात्र, पुतळा कोसळल्याने राज्यात हाच संतप्त असून हा महाराजांचा अपमान असल्याची प्रतिक्रिया उमटत आहे. त्यामुळे मोदी राज्यात आल्याने कोणती प्रतिक्रिया देणार याकडे लक्ष होते. मात्र, त्यांनी थेट माफीनामा देत वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

पीएम मोदी म्हणाले की, मला पंतप्रधानपदाचा उमेदवार निर्चित केल्यानंतर मी रायगड किल्ल्यावर शिवाजी महाराज यांच्या समाधीसमोर जाऊन प्रार्थना केली होती. एक भक्त आपल्या आराध्य दैवताची प्रार्थना करतो, तशी मी राष्ट्रसेवेच्या यात्रेला प्रारंभ केला होता. काही दिवसांपूर्वी सिंधुदुर्गात जे काही घडलं ते माझ्यासाठी आणि माझ्या सहका-यांसाठी छत्रपती शिवाजी महाराज फक्त एक नाव नाही, फक्त एक राजा नाही, तर शिवाजी महाराज आमच्यासाठी आराध्य दैवत आहेत. आज मी मस्तक झुकवून मी माझं आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांची त्यांच्या पायावर मस्तक ठेवून माफी मागतो. या घटनेवरून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महाराष्ट्राची माफी मागितल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही शिवरायांची शंभरवेळा माफी मागण्यासाठी तयार असल्याचे म्हटले होते.

# देगलूरचे आमदार जितेश अंतापूरकर अखेर अधिकृतपणे भाजपात, मुंबईत केला प्रवेश

**नदिड : जिल्ह्यातील देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघाचे कॉंग्रेस आमदार जितेश अंतापूरकर यांनी अखेर कॉंग्रेसला सोडचिठ्ठी देत अधिकृतपणे भारतीय जनता पक्षात मुंबई येथे शुक्रवारी प्रवेश केला आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला.**

जितेश अंतापूरकर यांनी कॉंग्रेस पक्षाच्या सदस्यत्वाचा आणि आमदारकीचा राजीनामा दिला. त्यामुळे देगलूर-बिलोली मतदारसंघातील कॉंग्रेस पदाधिका-यांमध्ये असंतोषाचं वातावरण आहे.




दिवंगत आमदार रावसाहेब अंतापूरकर यांच्या अकाली निधनानं देगलूर-बिलोली विधानसभेच्या पोटनिवडणुकीत जितेश अंतापूरकरांना कॉंग्रेस पक्षाने संधी दिली होती. मतदार संघात देखील सहानुभूतीथी लाट होती. दुसरीकडे शिवसेनेचे कट्टर समर्थक असलेले सुभाष साबणे यांनी देखील भाजपमध्ये प्रवेश करून पोटनिवडणुकीत जितेश अंतापूरकर यांच्या विरोधात उमेद्वारी दाखल करून आव्हान निर्माण केले होते. माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण हे कॉंग्रेसमध्ये असताना त्यांनी अंतापूरकर यांचा प्रचार करून ही निवडणूक प्रतिष्ठेची केली होती. त्यामुळे ते विजयी झाले होते. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी कॉंग्रेसता सोडचिठ्ठी देऊन भाजपमध्ये प्रवेश केला. त्यानंतर जितेश अंतापूरकर देखील भाजपमध्ये जातील अशी चर्चा होती. मात्र त्यांनी उघडपणे भाजपात प्रवेश करणे टाळले होते. आता अखेर शुक्रवार, दि. ३० ऑगस्ट रोजी त्यांनी कॉंग्रेस पक्षाच्या सदस्यत्वाचा आणि आमदारकीचा राजीनामा दिला. त्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मुंबईत भाजपमध्ये पक्षप्रवेश केला. पावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, खासदार अशोकराव चव्हाण, माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर, माजी आमदार राम पाटील रातोळीकर, भाजप माजी जिल्हाध्यक्ष व्यंकटराव पाटील गोजेगावकर यांची उपस्थिती होती.




# थोडक्यात

## असूरी राजकारणाच्या विरोधात भाजपातर्फे निषेध



लोकादेश न्यूज, किनवट, ता.०१ : राजकोट येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्या संदर्भात महाविकास आघाडी कडून असुरी राजकारण सुरू असून सतत द्वेष पसरविण्याचे काम करीत आहेत. याचा निषेध म्हणून शिवभक्त व भाजपा युवा मोर्चाच्या वतीने नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष किशोरजी देशमुख, आमदार भीमराव केराम साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष स्वागत आयनेनिवार यांच्या प्रमुख उपस्थितीत युवा मोर्चा तालुकाध्यक्ष आशतोष बेद्रे यांच्या नेतृत्वाखाली किनवट येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये दिनांक सप्टेंबर रोजी सकाळी वाजता निषेध आंदोलन करण्यात आले.

महाविकास आघाडी कडून छत्रपती शिवाजी महाराजांविषयी चुकीची माहिती सांगून शिवप्रेमी बांधवांचे मन दुखवण्याचे काम मोठ्या प्रमाणात केले जात आहे. म्हणून निषेध फलक दाखवून, विविध घोषणा देऊन महाविकास आघाडीच्या नेत्यांचा निषेध करण्यात आला.

यावेळी माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, शहराध्यक्ष संतोषराव चनमणवार, विश्वास कोल्हारीकर, बाळकृष्ण कदम, जयराज वर्मा, सतीश बिराजदार, राहुल दरगुलवार,पवन गिरी,पृथ्वीराज ठाकरे, बाबू जाटवे, शिवा क्यातमवार, शिवा आंधळे, बबलू नाईक, सुरेश सकपेल्लीवार,कृष्णा कालकुंटलावार,राज नाईक आदी शिवभक्त मोठा संख्येने उपस्थित होते.

## किनवट ते शेगाव बस सुरू ; अमन कुंडगीर यांच्या प्रयत्नांना यश



**लोकादेश न्यूज, किनवट ता.२७ : शहरासह तालुक्यातील प्रवाशांच्या गैरसोयी लक्षात घेता, नागरिकांच्या सोयीसाठी लांब पल्ल्याच्या बसगाड्या सुरू करण्यात याव्यात, या मागणीचे निवेदन धनगर समाज संघर्ष समिती, महाराष्ट्र राज्यचे युवक प्रदेशाध्यक्ष अमन कुंडगीर यांनी मा.खा.पद्मश्री डॉ.विकास महात्मे व किनवट-माहूरचे आमदार भीमराव केराम तसेच किनवट बस आगार प्रमुखांना दिले होते. या निवेदनाची दखल घेऊन किनवट बस आगाराने किनवट ते शेगाव बससेवा सुरू केली आहे. त्यामुळे शेगावकडे प्रवास करणा-या प्रवाशांनी समाधान व्यक्त केले आहे.**

संत गजानन महाराजांच्या समाधीस्थळाचे दर्शन घेण्यासाठी जाणा-या किनवट तालुक्यातील भाविकांना रेल्वे व बस या दोन्हीचीही सोय नसल्यामुळे मोठ्या अडचणीला सामोरे जावे लागत होते. त्यामुळे शेकडो भाविकांची ही मागणी अनेक दिवसांपासूनची होती. ही बाब लक्षात आल्यानंतर अमन कुंडगीर यांनी या गैरसोयी संदर्भात उपरोल्लेखित निवेदन दिल्यानंतर डॉ.विकास महात्मे यांनी आगाराच्या वरिष्ठांना कळवून लांब पल्ल्याच्या गाड्या सुरू करण्याविषयी सूचना केली. तसेच आ.केराम यांनीही याविषयी पालकमंत्र्यांकडे पाठपुरावा केला होता. अखेर या प्रयत्नांना यश येऊन, किनवट ते शेगाव ही लांब पल्ल्याची बस सेवा सुरू झाल्याने अमन कुंडगीर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री गिरीश महाजन, डॉ.विकास महात्मे व आमदार भीमराव केराम यांचे



आभार व्यक्त केले आहे. सोबतच दुपारच्या नंतर नांदेडसाठी कुठलीही रेल्वे वा एस.टी.नसल्यामुळे किनवट-नांदेड अशी एक बस सायंकाळच्या वेळेत चालू करण्याची मागणी केली होती. तशी सोय लवकरच उपलब्ध करून देऊत, अशी ग्वाही आगार प्रमुखांना दिल्याचे समजते.

## जातीय तेढ निर्माण करणा-या विरूध्द गुन्हा दाखल करण्याची जमियत-ए-उलमा-ए-हिंद ची मागणी



लोकादेश न्यूज, किनवट : दोन धर्मियांमध्ये जाणुनबुजुन जातीय तेढ निर्माण करुन धार्मिक कलह, द्वेष पसरवण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी रामगीरी गुरु नारायण गिरी महाराज, सरला बेट यांच्यावर गुन्हा दाखल करुन तातडीने अटक करण्याची मागणी किनवटचे पोलीस नीरक्षक यांन निवेदन देऊन करण्यात आली आहे, रामगीरी गुरु नारायण गिरी महाराज, सरला बेट यांनी मौजे पंचाळे, ता. सिन्नर, जि. नाशिक या ठिकाणी सप्ताहा दरम्यान प्रवाचनामध्ये उपस्थित जनसमुदायासमोर मुस्लिम धर्माची व धर्मगुरुची प्रतिमा मलीन होईल, असे जाणिवपूर्वक प्रवचन केले आहे. या वक्तव्यामुळे व अशा प्रकारच्या प्रवचनामुळे हिंदू-मुस्लिम या दोन समाजामध्ये मने कलुषित करुन जातीय तणाव, धार्मिक दवेष पसरवण्याचा जाणिवपूर्वक प्रयत्न केला जात आहे.आपण समस्येचे गांभीर्य ओळखून रामगीरी गुरु नारायण गिरी महाराज, सरला बेट, ता.वैजापूर जि. औरंगाबाद यांच्यावर विविध कलमंतर्गत फौजदारी गुन्हा दाखल करून त्यांना अटक करावी असे निवेदन देण्यात आले या वेळी हाफिझ शर्फोद्दिन साहेब,मुफ्ती तन्वीर साहेब, मुफ्ती मो.सिद्दिक साहेब,मो शिफीओद्दिन शमशोद्दिन, मुफ्ती फिरोझ साहेब, शाहबोद्दिन चव्हान, हाफिझ मोईन साहेब, मौलाना सुलेमान साहेब, हाफिझ सुलेमान खान, शेख रफिक मौलाली आदी उपस्थित होते.

## अंबाडी येथील आरोग्य तपासणी शिबीरात १९ गर्भवती महिलांनी घेतला सहभाग



**लोकादेश न्यूज, अंबाडी : २५ ऑगस्ट २०२४ रोजी अंबाडी येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात आयोजित प्रसूति पूर्व आरोग्य तपासणी शिबीरात १९ गर्भवती महिलांनी सहभाग घेतला. या शिबीराचे आयोजन भारत जोडो युवा अकादमी संचलीत साने गुरुजी रुग्णालय व संशोधन केंद्र, किनवट, आणि प्राथमिक आरोग्य केंद्र, राजगड यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. शिबीराचा उद्देश अंबाडी परिसरातील मातांचे आरोग्य सुधारून, सुरक्षित प्रसूति आणि निरोगी बालकांचा जन्म व्हावा हा होता.**

ज्येष्ठ समाजसेवक डॉ. अशोक बेलखोडे (एस. सर्जन), यांच्या नेतृत्वाखाली सुरु केलेल्या महिला आरोग्य अभियानाचा हा एक भाग होता. या अभियानांतर्गत आदिवासी भागातील वंचित महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी, उपचार आणि मार्गदर्शन सेवा दिल्या जातात. यामध्ये गरोदर माता, किशोरवयीन मुली, वृद्ध महिला आणि इतरांनाही समाविष्ट करण्यात आले आहे.

शिबीरात उपस्थित असलेल्या १९ गर्भवती महिलांनी डॉ. भाग्यश्री बेलखोडे-वरटकर (MBBS, DGO), साने गुरुजी रुग्णालयाच्या स्त्री रोगतज्ञ यांच्याकडून संपूर्ण आरोग्य तपासणी आणि प्रसूति पूर्व मार्गदर्शन केले. शिबीरात एकूण ६१ रुग्णांची तपासणी करण्यात आली, ज्यामध्ये गर्भवती महिलांच्या रक्त आणि मूत्र तपासण्या, तसेच मासिक पाळीच्या अनियमितता, सांधे दुखणे, आणि पोटदुखी अशा विविध आजारांची तपासणी व उपचार करण्यात आले. विशेष म्हणजे त्यात महिला वंध्यत्व निवारण या संदर्भात अडचण असलेल्या ०७ महिलांचा समावेश होता.

वर्षा भगत-गोवंदे यांनी उपस्थित गर्भवती महिलांना गर्भधारणेच्या काळात योग्य आहार, पुरेशी विश्रांती, आणि नियमित तपासणी यांचे महत्त्व समजावून सांगितले. त्यांनी स्थानिक उपकेंद्रामध्ये उपलब्ध असलेल्या सेवांचा योग्य फायदा घेण्याचे आवाहन केले. डॉ. भाग्यश्री बेलखोडे-वरटकर यांनी गर्भाशय काढण्याच्या वाढत्या प्रमाणाबद्दल चिंता व्यक्त करत, केवळ अत्यंत आवश्यक असल्यासच ही शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला.

शिबीराच्या समारोपात डॉ. अशोक बेलखोडे यांनी महिलांना आपले आरोग्य योग्य पद्धतीने सांभाळण्याचे आवाहन केले. त्यांनी संतुलित आहाराचे महत्त्व, वेळेवर औषधोपचार, यांचे महत्व सांगून अपात्र वैद्यकीय व्यवसायीकांपासून सावध राहण्याची सूचना केली. या शिबीराचे प्रास्ताविक आंबाडी गावाचे उपसरपंच दिपक तांबगाडगे यांनी केले. कार्यक्रमात प्रमुख व्यक्तींचा सन्मान करण्यात आला.

शिबीराच्या यशस्वी आयोजनासाठी अंबाडी उपकेंद्राचे आरोग्य सेवक आशीर्वाद दिसावार, अनिल पिंपरे, परीचारीका वैशाली सुंकटवार, सविता चव्हाण, आशा वर्कर पुष्पा राठोड, मधुमती कावळे, सुमित्रा मेश्राम, अर्चना मुन्नेर, सुरेखा नैताम, लक्ष्मण ठमके, किशन आडे, गिरीराज जाधव, साने गुरुजी रुग्णालयाचे व्यवस्थापक श्री. संजय बोलेणवार, अजय नरड, अजिंक्य कायापाक, नागेश देवतळे, आर्चना डोंगरे, विपीन पवार, निखील साखरे, रुग्ण सहाय्यक अभ्यासक्रम प्रशिक्षणार्थी कशिष निकोडे यांनी विशेष प्रयत्न केले. सदर शिबीर तालुका आरोग्य अधिकारी, डॉ. के पी. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले, ज्यामध्ये गर्भवती महिलांना आवश्यक त्या औषधांचा पुरवठा करण्यात आला.

### किनवट-माहूर विधानसभेचे सक्रीय नेते सचिन नाईक यांच्या सौभाग्यवती

## सपना नाईक यांचा तीज महोत्सवात सहभाग



लोकादेश न्यूज, किनवट : बंजारा समाजात सर्वात महत्त्वाचा सण म्हणून ओळखल्या जाणा-या तिज महोत्सव दरम्यान आगामी विधानसभा निवडणुकीसाठी सक्रिय असलेले नेते सचिन नाईक यांच्या सौभाग्यवती सपना नाईक यांना मानाचे स्थान मिळत असून युवा नेते सचिन नाईक हे सर्व समाजामध्ये लोकप्रिय ठरत आहेत.

गत आठ ते दहा वर्षापासून युवा नेते सचिन नाईक हे कोणत्याही पक्षाकडून कोण्या पदाची अपेक्षा न बाळगता किनवट- माहूर विधानसभेतील जनसामान्यांसाठी आपल्या सचिन नाईक मित्र मंडळाच्या माध्यमातून किनवट माहूर विधानसभा क्षेत्रात आपली सामाजिक बांधिलकी जोपासत गोरगरीब जनसामान्यासाठी, बेरोजगार होतकरू कार्यकर्त्यासाठी आरोग्य, शिक्षण, रोजगार अशा अनेक गरजा पूर्ण करण्यासाठी काम करत आहेत. त्याचेच फलित आज लोकप्रियतेत होताना दिसत आहे. आज ते गोरगरीब समाजासाठी तिसरा पर्याय म्हणून त्यांना आज विधानसभा निवडणुकीसाठी पहिली पसंती मिळत आहे. हे वास्तव नाकारता येणार नाही. दोन्ही तालुक्यातील ग्रामीण भागातील गाव, वाडी, तांडे व शहरासहित सर्वपरिचित आहेत. सध्या स्थित कोण्या पक्षात प्रवेश केला नसला तरी गत लोकसभेच्या निवडणुकीमध्ये त्यांनी महायुतीचे काम केले होते. सारखणीतील सभा त्यांनी गाजवून दाखवली होती. त्यामुळे महायुतीतील सर्वच नेतृत्वांच्या नजरा सचिन नाईकाकडे लागल्या आहेत एवढे मात्र खरे. तीज उत्सव महिला भगीणींचा असून प्रत्येक तांड्यावर या उत्सवाचा रंग चढत आहे. या उत्सवाची सांगता धान्याची मिरवणूक वाजतगाजत पारंपारिक नृत्य गाणे म्हणत गावकुसाबाहेर नदी, नाल्याच्या प्रवाहात धान्याचे वाढलेले आंकूर विसर्जीत करतात. सपना सचिन नाईक यांनी किनवट - माहूर तालुक्यातील विविध तांड्यावर जावुन तिज मोहत्सवात सहभागी झाल्या आहेत.

## दिव्यांगांना मोफत उपकरणे वाटपासाठी तपासणी शिबीर संपन्न

**लोकादेश न्यूज, किनवट ता.२९ : दिव्यांगांना मोफत उपकरणे वाटपासाठी तपासणी शिबिर संपन्न किनवट,दि.२९ (प्रतिनिधी) : दिव्यांगजन सशक्तीकरण विभाग सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालय, केंद्र सरकारच्या उपक्रमाद्वारे दिव्यांगांना सहायक उपकरणे मोफत वाटपासाठी तपासणी शिबिराचे आयोजन शहरातील जिल्हा परिषद हायस्कूल (मुलांचे) येथे मंगळवारी (दि.२७) करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन युवासेनेचे विस्तारक कृष्णा पाटील आष्टीकर यांच्या हस्ते करण्यात आले.**

या शिबिरात शंभर ते सव्वाशेपर्यंत कर्णबधीर दिव्यांग व्यक्तींची नोंद झाली होती; तर मतिमंद प्रवर्गातील ६० ते ७०, २०० अपंग दिव्यांग तर ४० ते ५० दृष्टीहीन दिव्यांगांची नोंदणी करून तपासणी करण्यात आली आहे.

या शिबिरास उपस्थित दिव्यांग बांधवांना युवासेनेचे विस्तारक कृष्णा पाटील आष्टीकर यांनी अल्पाहार व पाण्याची व्यवस्था केली होती. या तपासणीनंतर आयोजक भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (अलिम्को) मुंबई यांच्यामार्फत शिबिरातील पात्र दिव्यांगांना दुसरे शिबिर घेऊन श्रवण यंत्र, व्हीलचेअर, व्हील सायकल, कृत्रिम अवयव, मतिमंदांसाठी किट तसेच अंध दिव्यांगांना घुंगरू काठी वाटप



करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा समन्वयक डॉ. अनिल देवसरकर यांनी दिली आहे. यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे तालुकाप्रमुख मारोती दिवसे पाटील, युवासेनेचे अतुल दर्शनवाड, बजरंग वाडगुरे, खासदार नागेश पाटील आष्टीकर यांचे किनवट-माहूर जनसंपर्क अधिकारी कपिल सातव, मारोती देवठणकर, प्रहार संघटनेचे तालुका अध्यक्ष भगवान मारपवार यांच्यासह डॉ. अनिल देवसरकर यांचे सहकारी उपस्थित होते.

## ग्रामपंचायतीतील १५ लाखांपर्यंतची कामे आता कंत्राटदारामार्फत होणार

### ग्रा.पं.तील मनमानी कारभाराला लगाम ; अभियंते व लहान कंत्राटदारांना दिलासा

**लोकादेश न्यूज, किनवट ता.२८ : आतापर्यंत १५ लाखांपर्यंतची कामे विनानिविदा करण्यास ग्रामपंचायतींना परवानगी असल्यामुळे जिल्हा परिषदेच्या मान्यताप्राप्त नोंदणी असलेले सुशिक्षित बेरोजगार अभियंता, कंत्राटदार, मजूर सहकारी संस्थांना या कामांपासून वंचित राहावे लागत होते. त्यामुळे, त्यांनी उच्च न्यायालयात याविषयी दाद मागितली होती. त्या पार्भूमीवर आता यापुढे १५ लाखांपर्यंतची कामेसुद्धा मान्यताप्राप्त कंत्राटदारांमार्फत घेण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. हा निर्णय म्हणजे सुशिक्षित बेरोजगार अभियंते, लहान कंत्राटदारांसाठी फायदेशीर असल्याचे बोलले जात आहे. विशेष म्हणजे कंत्राटदार संघटनेने न्यायालयात धाव घेतल्यानंतर शासनाने हा निर्णय घेतला आहे.**

शासनाच्या ग्रामविकास विभागाकडून १२ नोव्हेंबर २०२१ च्या निर्णयानुसार जिल्हा परिषद व पंचायत समितीला पंधराव्या वित्त आयोगांतर्गत शासननिधीतून १५ लाखांपर्यंतची सर्व कामे करण्यास परवानगी देण्यात आली होती. या निर्णयामुळे जिल्हा परिषद अंतर्गत नोंदणी असलेले सुशिक्षित बेरोजगार, स्थापत्य अभियंता, कंत्राटदार तसेच मजूर सहकारी संस्थांना १५ लाखाच्या आतील कामेच मिळत नव्हती. त्यामुळे कंत्राटदार व मजुरांच्या हाताला कामच उपलब्ध नव्हते. तसेच ग्रामपंचायतींकडून १५ लाखांच्या आतील ही कामे परस्पर केली जात होती; शिवाय ग्रामपंचायत पदाधिकारी आपल्या मर्जीतील लोकांनाच ही कामे देत होते. यातून ग्रामपंचायत आणि ठेकेदार हे समीकरण तयार झाले होते. अनेक ठिकाणी अनेकदा नियमबाह्य पद्धतीने कामे दिली गेली, अशी ओरड सातत्याने होत होती. त्यामुळे या निर्णयाविरोधात महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाने आव्हान देत मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्या अनुषंगाने मुंबई उच्च न्यायालयाने १० जुलै २०२४ रोजी दिलेल्या आदेशाचा आधार घेऊन २२ जुलै २०२४ रोजी जिल्हा परिषदांना यापुढे ग्रामपंचायतींना कामे न देण्याबाबत कळविले असून, शासनाने एक पाऊल मागे घेत आपला निर्णय फिरविला आहे. शासनाने बदलेल्या भूमिकेमुळे मात्र आता लहान कंत्राटदारांनासुद्धा नियमानुसार कामे करता येणार आहेत. यापुढे १२ नोव्हेंबर तसेच ३० डिसेंबर २०२१ चे पत्र पूर्वलक्षी प्रभावाने रद्द केले असून, आदेशाचे उल्लंघन झाल्यास जिल्हा परिषद प्रशासनाला जबाबदार धरले जाणार आहे.

## खरीप पीकविमा योजनेत ८५ हजार ६०८ अर्ज

### किनवट तालुका : ६१ हजार ४३६ हेक्टरवरील पिके संरक्षित

लोकादेश न्यूज, किनवट, ता.२८ : या वर्षीच्या खरीप हंगामात गत ०१ ऑगस्ट पर्यंत पंतप्रधान पीकविमा योजनेअंतर्गत किनवट तालुक्यातील ३९ हजार ५९० शेतक-यांनी ८५ हजार ६०८ पीक विमा अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळे या शेतक-यांची ६१ हजार ४३६ हेक्टरवरील विविध पिके विमा संरक्षित झाली आहेत, अशी माहिती कृषी विभागाच्या सूत्रांनी दिली.

नांदेड जिल्ह्यातील १६ तालुक्यांसाठी युनायटेड इंडिया इंन्शुरन्स कंपनीच्या माध्यमातून ही विमा योजना राबविण्यात येत असून, कापूस, सोयाबीन, तूर, मूग, उडीद, ज्वारी या सहा पिकांसाठी ही योजना लागू आहे. किनवट तालुक्यातील एकूण ३९ हजार ५९० शेतक-यांनी केवळ एक रुपया भरून तब्बल ८५ हजार ६०८ पीक विमा अर्ज बँका तसेच सामाईक सुविधा केंद्र (सीएससी) तसेच पीकविमा पोर्टलच्या माध्यमातून तर काही शेतक-यांनी वैयक्तिकरित्या देखील विमा अर्ज दाखल केले आहेत. त्यानुसार किनवट तालुक्यातील खरिपाच्या ६१ हजार ४३६.४७ हेक्टरवरील पिकांसाठी ०३ अब्ज २९ कोटी १८ लाख ३९ हजार ९९३.४३ रुपये एवढ्या विमा रकमेचे संरक्षण घेतल्या गेले आहे. शेतक-यांनी प्रति अर्ज एक रुपयानुसार ८५ हजार ६०८ रुपये विमा हप्ता भरला आहे. राज्य शासनाच्या हिश्शाचा २९ कोटी ६० लाख १२ हजार ७५४.६९ रुपये व केंद्र शासनाच्या हिश्शाचा २० कोटी २४ लाख ६१ हजार ६५१.२९ रुपये विमा हप्ता आहे. राज्य व केंद्राचा हिस्सा व शेतक-यांचा हप्ता एकत्रित करून एकूण ४९ कोटी ८५ लक्ष ६० हजार ०१३.९८ विमा हप्ता युनायटेड कंपनीकडे जमा करण्यात आलेला आहे. या ८५,६०८ आलेल्या विमा अर्जामध्ये ३ हजार ४३१ किरकोळ, १ हजार ७१३ इतर तर ८० हजार ४६४ हे लहान शेतकरी असून, यात ३ हजार ९१३ अनुसूचित जातीचे (एससी), १५ हजार २९९ अनुसूचित जमातीचे (एसटी), ३४ हजार ३५८ हे ओबीसी तर ३२ हजार ०३८ हे जनरल कॅटेगरीतील आहेत.

ग्रामीण भागात शेतक-यांना शेती करताना अनेक अडचणी येतात. त्यामुळे पीक उत्पादनालाही फटका बसतो. यासाठी पीक विमा योजना सुरू करण्यात आलेली आहे. यामध्ये अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट, पावसातील खंड, ढगफुटी, चक्रीवादळ आदी कारणाने पिकाचे नुकसान झाल्यास विमा उतरविलेल्या पिकांसाठी भरपाई देण्यात येते. यासाठी पूर्वी शेतक-यांना विमा हप्त्यापोटी ठराविक रक्कम भरावी लागत होती. सोबत राज्य आणि केंद्र शासनाचाही वाटा असायचा; पण राज्य शासनाने गेल्या वर्षीच्या खरीप हंगामापासून शेतक-यांना एक रुपयांत पीक विमा देण्याचा निर्णय घेतलेला आहे.

**किनवट तालुक्यातील महसूलमंडळनिहाय पीकविमा अर्ज स्थिती (विमा संरक्षित क्षेत्र हेक्टरमध्ये)**

| महसूल मंडळ | पीक विमा अर्ज | विमा संरक्षित क्षेत्र |
|---|---|---|
| बोधडी | ११,०६७ | ८,१८६.४२ |
| दहेली | ०८,२९० | ६,७१८.९५ |
| इस्लापूर | १३,९८७ | ९,६३२.७० |
| जलधारा | ०८,८३७ | ६,२४९.७५ |
| किनवट | ०८,०६९ | ६,३०९.०१ |
| मांडवी | ०७,३४६ | ५,५९७.४३ |
| शिवणी | ११,११६ | ७,४१०.७४ |
| सिंदगी मोहपूर | ०८,३१३ | ६,०४७.३१ |
| उमरी बाजार | ०८,५८३ | ५,२८४.१६ |
| एकुण | ८५,६०८ | ६१,४३६.४७ |

# आदिवासी भागातील पेसा कायद्यांतर्गत भरतीचा प्रश्न सोडविण्यासाठी शासन सकारात्मक-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## याचिकेच्या निकालाच्या अधीन राहून आदिवासी उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाला विनंती करणार । मुख्यमंत्र्यांसोबतच्या बैठकीनंतर पेसा भरतीबाबतचे आंदोलन स्थगित

**मुंबई दि. २९ : आदिवासी भागातील पेसा कायद्यांतर्गत भरतीचा प्र न सोडविण्यासाठी शासन सकारात्मक आहे. सर्वोच्च न्यायालयात याबाबत दाखल याचिकेच्या निकालाच्या अधीन राहून आदिवासी उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबत विनंती न्यायालयाला करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.**

पेसा क्षेत्रातील भरतीचा प्र नासह इतर विषयांबाबत सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. पेसा क्षेत्रातील भरतीसाठी नाशिक येथे उपोषणास बसलेल्या जे.पी. गावित यांनी मुख्यमंत्र्यांच्या आाासनानंतर तात्पुरत्या स्वरूपात उपोषण मागे घेतले.



यावेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, की आदिवासी बांधवांचा विकास हा आमच्या प्राधान्याचा विषय आहे. आदिवासी भागातील आरोग्य सेवा मजबूत करण्यासाठी तेथील गावाच्या विकासासाठी ग्रामसभा सक्षम करण्यासाठी तातडीने पाऊले उचलली जातील. याकरिता पेसा क्षेत्रातील आरोग्य विभागासह इतर सर्व विभागांची पद प्राधान्याने भरण्यात येतील. आदिवासी भागाच्या विकासासाठी नव्या दमाच्या सनदी अधिका-यांच्या नियुक्त्या करण्यात येतील. तसेच ग्रामसभेला काही प्रमाणात निधी खर्चाचे अधिकार देण्यासाठी राज्यपालांना विनंती करण्यात येईल , असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

तसेच आदिवासींच्या कब्जातील हक्कदारांच्या सातबा-यावर त्यांची स्वतंत्रपणे नोंद करण्यात येईल. क्रीडापटू कविता राऊत यांची शासकीय सेवेत लवकरच थेट नियुक्ती करण्यात येईल , असे ही मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

या बैठकीला विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवळ, आदिवासी विकास मंत्री विजयकुमार गावित, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव असीमकुमार गुप्ता यांच्या सह इतर मान्यवर उपस्थित होते.

# पारंपरिक सण-उत्सव शांततेत पार पडण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे- तहसीलदार शारदा चौंडेकर

## पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन

**लोकादेश न्यूज, किनवट ता.२९ : समाजात अनेक जाती-धर्माचे लोक वास्तव्यास आहेत. आगामी पोळा, गणेशोत्सव, अनंत चतुर्दशी व ईद-ए-मिलाद हे सण साजरे करतांना कुणाच्याही भावना दुखावल्या जाणार नाहीत, याची सर्व नागरिकांनी काळजी घेत धार्मिक सलोखा व सद्‌भावना कायम ठेऊन, हे सण व उत्सव सुरळीत पार पाडण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन येथील तहसीलदार शारदा चौंडेकर यांनी केले.**

गुरूवारी (दि.२९) सकाळी ११ वाजता येथील तहसील कार्यालयात आयोजिलेल्या शांतता समितीच्या बैठकीत त्या बोलत होत्या. या वेळी येथील उपविभागीय पोलीस अधिकारी रामकृष्ण मळघणे, माहूरचे तहसीलदार किशोर यादव, पो.नि. सुनिल बिर्ला, माहूरचे पो.नि. मुळे



यांची प्रमुख उपस्थिती होती. सहा.जिल्हाधिकारी व प्रकल्प अधिकारी कावली मेघना (भाप्रसे) यांच्या अध्यक्षतेखाली आयोजिलेल्या या शांतता समितीच्या बैठकीस पंतप्रधान जनजाती आदिवासी न्याय महाअभियानाच्या अत्यावश्यक कामकाजामुळे त्या उपस्थित राहू न शकल्यामुळे, ही बैठक तहसीलदार शारदा चौंडेकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

या बैठकीत उपस्थितांना संबोधित करतांना डिवायएसपी रामकृष्ण मळघणे म्हणाले की, प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती पाण्यात विरघळत नसल्यामुळे, सर्व गणेश मंडळांनी

पर्यावरण पूरक शाडू मातीच्या गणेश मूर्तींना प्राधान्य द्यावे, गणेशोत्सवा दरम्यान डिजे वाजविण्यावर बंदी असून, ध्वनीवर्धकाचा आवाज मर्यादित ठेवावे व मंडळाचे सर्व कार्यक्रम रात्री दहापर्यंतच ठेवणे आवश्यक असल्याचे सांगितले. पो.नि.सुनील बिर्ला यांनी बोलतांना गणेशोत्सवात मंडपामध्ये व मिरवणुकीदरम्यान कोणीही मद्य प्राशन करू नये, तसेच कुठेही महिलांची छेडछाड होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी. तसेच वर्गणी मागताना कोणालाही सक्ती करू नये असे आवाहन केले. दरम्यान, उपस्थितांपैकी काही नागरिकांनी विचारलेल्या प्र नांचे समाधान करण्यात आले. यावेळी एसडीओ कार्यालयातील प्रतिनिधी शिवकांता होनवडजकर मॅडम, इस्लापूर, मांडवी, सिंदखेड, माहूर येथील सर्व एपीआय, किनवट व माहूर तालुक्यातील सर्व पोलीस पाटील यांचेसह व्यापारी असोशिएशनचे अध्यक्ष दिनकर चाडावार, माजी नगराध्यक्ष केमूर्ती, विनोद भरणे, शिवराज राघूमामा, जहीरोद्दीनखान, मारोती सुंकलवाड,अजय कदम, भावना दिक्षित, शैलैश गटलेवार, विविध वृत्तपत्राचे प्रतिनिधी व प्रतिष्ठित नागरिक यांची उपस्थिती होते.

## हिंगोलीच्या जिल्हाधिकारीपदी अभिनव गोयल रुजू



हिंगोली (जिमाका), दि. ३० : हिंगोलीच्या जिल्हाधिकारी पदी अभिनव गोयल गुरुवारी (दि. २९) रोजी रुजू झाले आहेत. त्यांनी प्रभारी तथा अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांच्याकडून जिल्हाधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारला.

जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी आयआयटी कानपूर येथून सिव्हील इंजिनिअरची पदवी घेतली आहे. ते सन २०१६ च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. त्यांनी यापूर्वी नांदेड जिल्ह्यातील किनवट येथे आदिवासी विकास प्रकल्प विभागात सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी म्हणून काम केले आहे. तसेच त्यांनी लातूर जिल्हा परिषदेचो मुख्य कार्यकारी अधिकारी, धुळ्याचे जिल्हाधिकारी म्हणून काम केले आहे.

# नांदेड जिल्ह्यातील सर्व उप अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालयात ई-मोजणी आज्ञावली कार्यान्वित

## ई मोजणी बाबत आज अधिकारी कर्मचारी याना प्रशिक्षण



**नांदेड, दिनांक ३१ ऑगस्टः- नांदेड जिल्ह्यात ई-मोजणी ज्ङ्खद्ध-११ आज्ञावली ही पहिल्या टप्यात उप अधीक्षक भूमि अभिलेख अर्धापुर, दुस-या टप्यात उप अधीक्षक भूमि अभिलेख हदगाव,मुदखेड व तिस-या टप्यात उप अधीक्षक भूमि अभिलेख नांदेड, बिलोली व लोहा कार्यालयात कार्यन्वित करण्यात आली आहे . तसेच उर्वरित सर्व तालुक्यात उद्या ०१ सप्टेंबर २०२४ पासून कार्यन्वित करण्यात येणार आहे.**

जिल्ह्यातील सर्व उप अधीक्षक भूमि अभिलेख व कर्मचारी यांना आज प्रशिक्षण देण्यात आले आहे.ई-मोजणी ज्ङ्खद्ध-११ आज्ञावली मधे नागरिकाना घरबसल्या ऑनलाइन मोजणी अर्ज करता येतो तसेच अर्जदार यांना अंक्षास व रेखांश आधारे नकाशा पुरविण्यात येणार आहे .त्यामुळे मोजणी कामात पारदर्शकता येणार आहे. सदर प्रशिक्षण जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख सीमा देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आज नियोजन भवन नांदेड येथे घेण्यात आले.

यावेळी जिल्ह्यातील सर्व अधिकारी व कर्मचारी प्रशिक्षणास हजर होते.सदर प्रशिक्षणावेळी सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी विचारलेल्या शंक्चे निरसन बी. व्ही मस्के उप अधीक्षक भूमि अभिलेख नांदेड यांनी केले.

# भटक्या व विमुक्तांना समाजाच्या प्रवाहात आणण्यासाठी सर्वाचा सहभाग महत्वाचा : जिल्हाधिकारी अभिजीत राऊत

## सेवा देताना माणुसकी व कर्तव्याची भावना आवश्यक

## जिल्हाधिकारी यांच्या हस्ते विविध प्रमाणपत्राचे वाटप



**नांदेड दि. ३० ऑगस्ट :- रोजच्या जगण्यासाठी हातावर पोट घेवून संघर्ष करणा-या भटक्या विमुक्तांना शासकीय योजनाचा लाभ मिळावा, त्यांना रहिवासी प्रमाणपत्रा सोबतच इतर सर्व प्रमाणपत्र मिळावेत यासाठी शासन- प्रशासन प्रयत्नशिल आहे. तसेच भटक्या विमुक्तांना शासकीय योजनांचा लाभ मिळून त्यांना समाजाच्या प्रवाहात आणण्यासाठी सर्वाचा सहभाग खूप महत्वाचा असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले.**

आज महाराजस्व अभियानातर्गत भटक्या व विमुक्त जातीतील लोकांना जातीचे प्रमाणपत्र, रहीवासी व शिधापत्रिका वाटपाचा कार्यक्रम त्यांच्या हस्ते तहसिल कार्यालयात झाला. यावेळी ते बोलत होते. यावेळी उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, तहसिलदार संजय वारकड, भटकेव विमुक्त जाती जमातीचे महाराष्ट्राचे उपाध्यक्ष देविदास हादवे, पारंपारिक वेशभुषा परिधान केलेले वासुदेव, गारुडी, मसणजोगी, जोशी, गोंधळी, पारधी, भोई समाजातील नागरिक आदीची उपस्थिती होती.

भटक्या विमुक्त जातीतील लोकाकडे कुठलाच पुरावा नसतो. त्यामुळे त्यांना रहीवासी प्रमाणपत्र मिळत नाही. म्हणून ते योजनांपासून वंचित राहण्याची शक्यता असते. यासाठी मागील काळात जिल्ह्यातील बळीरामपूर, चौफाळा, लोहा तालुक्यातील किवळा येथे शिबिराचे आयोजन करुन अनेक लोकांना रहीवासी प्रमाणपत्रासोबत इतर आवश्यक प्रमाणपत्राचे वितरण केले आहे. प्रमाणपत्राच्या उपलब्धीमुळे त्यांना शासकीय योजनांचा लाभ घेता येईल. त्यांना सर्व प्रकारचे प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी त्यांच्यापर्यत पोहोचून ते उपलब्ध करुन देण्यासाठी प्रशासनाच्यावतीने प्रयत्न करण्यात येत आहेत. आजच्या कार्यक्रमातही महसूल विभागातील अधिकारी-कर्मचा-यांनीही भटक्या विमुक्तांना आवश्यक ते प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही तत्परतेने केली याबाबतही जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी कौतुक केले. तसेच सेवा देताना अधिकारी कर्मचारी यांनी माणुसकी आणि कर्तव्याच्या भावनेतून नागरिकांची प्राध्यान्याने कामे करण्यावर भर द्यावा असेही त्यांनी यावेळी सांगितले.

तसेच भटक्या विमुक्त जातीतील सुशिक्षित तरुणांनी समाजातील इतर लोकांची पुढे आणण्यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या हस्ते २८ शिधापत्रिका, दोन उत्पनाचे प्रमाणपत्र, दोन जणांना रहीवासी प्रमाणपत्र, ९ जणांना जात प्रमाणपत्राचे प्रातिनिधिक स्वरूपात वाटप करण्यात आहे.

भटक्या विमुक्त जातीतील लोकांना विविध योजनांचा लाभ मिळावा त्यांना समाजाच्या प्रवाहात येता यावे यासाठी विविध प्रमाणपत्र उपलब्ध होण्यासाठी भटकेव विमुक्त जाती जमातीचे महाराष्ट्राचे उपाध्यक्ष देविदास हादवे यांनी खूप परिश्रम घेतले. याबाबत प्रशासनाच्यावतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ व तहसिलदार संजय वारकड यांनी मनोगत व्यक्त केली.

# अनुलोम पूर्ण महाराष्ट्रात सकारात्मकता पसरविण्याचे कार्य करते-आमदार भीमराव केराम

**लोकादेश न्यूज, किनवट : दिनांक २२ ते २४ ऑगस्ट रोजी दिघा गाव मुंबई येथे अनुलोम आणि रायगड दर्शन यात्रा असा ऊपक्रम पार पडला.ह्या कार्यक्रमात संपूर्ण महाराष्ट्रातील १५०० पेक्षा जास्त अनुलोम चे कार्यकर्ते आणि संवादिनी उपस्थित होत्या. ह्या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री तथा जलसंपदा मंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस साहेबांनी अनुलोम च्या कार्यकर्त्यांना संबोधित केले.**

ह्या कार्यक्रमात किनवट माहुर विधानसभेतील १७ वस्ती मित्र, संवादिनी उपस्थित होत्या.ह्या कार्यक्रमात सहभागी असणा-या सर्व मंडळींचा काल लोकार्पण जनसंपर्क कार्यालयात मा.आ.भीमरावजी केराम साहेबांनी सत्काराचा भव्य कार्यक्रम आयोजित केला होता.ह्या कार्यक्रमात अनुलोम स्लिम चे प्रमुख विजय मोरगूलवार यांनी खोट्या नेरेटिव्ह संदर्भात मार्गदर्शन केले.ह्या उपक्रमात सहभागी असलेल्या वस्ती मित्रांचे अनुभव कथन कार्यक्रमात सहभागी असलेल्या मंडळींनी अत्यंत शांतपणे ऐकून घेतले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात मा.आ.भीमरावजी केराम साहेबांनी आपल्या चिरपरिचित अंदाजात विरोधकांच्या चिंधड्या ऊडवीत अनुलोम पूर्ण महाराष्ट्रात सकारात्मकता पसरविण्याचे कार्य करते.समाजातील वंचित शोषीत घटकांसाठी कोणतीही अपेक्षा न



ठेवता त्यांच्या भल्याचा सतत विचार करणारी एकमेव संघटना असल्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला.मा.स्वानंदजी ओक, मा.सूजाताताई मराठे ,मा.विजयदादा मोरगूलवार आणि विदर्भ विभाग प्रमुख गजाननजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली किनवट विधानसभेत अनुलोम चे कार्यकर्ते भागात आपले कार्य अगदी योग्य रितीने करत आहेत.समाजात खोट्या वावड्या पसरवत समाजात जाती आणि धर्म भेद करणार्या खोट्या अफवा खोडून समाज एकसंध ठेवण्याची मोठी जवाबदारी आपल्या खांद्यावर असल्याचे वक्तव्य त्यांनी केले..!

ह्या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन भाग जनसेवक यांनी तर आभार प्रदर्शन भागसमन्वयक यांनी केले.

# रुग्णांनी नागपूर येथील एम्स रुग्णालयात अल्पदरात उपचार करून घ्यावा-अमन कुंडगीर



**लोकादेश न्यूज, किनवट : रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा हे ब्रीद मानुन अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान, नागपूर येथे मा.खा.पद्मश्री डॉ.विकास महात्मे सोशल फाऊंडेशनच्या वतीने गंभीर आजाराने ग्रस्त किंवा उपचारासाठी आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या असलेल्या रुग्णांसाठी वैद्यकीय सहाय्यता सेल स्थापन करण्यात आला आहे. ज्यामुळे गरीब व गरजू रुग्णांना याचा मोठा फायदा होत आहे. तरी गंभीर रुग्णांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन धनगर समाज संघर्ष समिती महाराष्ट्र राज्य चे युवक प्रदेशाध्यक्ष अमन कुंडगीर यांनी केले आहे.**

अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान मध्ये आरोग्याच्या समस्या असलेल्या गंभीर स्वरुपाच्या रुग्णांच्या मदतीसाठी ४७ क्रमांकाचे कंट्रोल रुम स्थापन करण्यात आले आहे. रुग्णांनी एम्स रुग्णालयात डॉक्टरांच्या तपासणी नंतर ४७ क्रमांकाच्या कंट्रोल रुमवर जावून आजाराची माहिती द्यावी, त्यानंतर वैद्यकीय सहाय्यता सेल आपणास मदत करेल. गंभीर आजाराच्या आरोग्य सुविधा बीपीएल पिवळे रेशनकार्ड धारकांसाठी मोफत असून इतरांना अगदी कमी दरात आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ज्यामुळे रुग्ण मुंबई, पुणे, हैद्राबाद येथे अधिक पैसे खर्च न करता एम्स नागपूर येथे मा.खा.पद्मश्री डॉ.विकास महात्मे सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून कमी दरात आपला उपचार करून घेवू शकतात. फाऊंडेशच्या माध्यमातून रुग्णांनी वैद्यकीय सुविधा मिळवून घेण्यासाठी वैद्यकीय सहाय्यता सेलचे महाराष्ट्र प्रमुख अमन कुंडगीर यांच्या ७५८८५२६६७० या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मा.खा.पद्मश्री डॉ.विकास महात्मे सोशल फाऊंडेशनमुळे अनेक रुग्ण एम्स नागपूर येथे जावून अल्पदरात आरोग्य सुविधा घेत आहे. फाऊंडेशनच्या माध्यमातून उपचार घेणांया रुग्णांनी एम्सचे अध्यक्ष मा.खा.पद्मश्री विकास महात्मे व फाऊंडेशनचे आभार मानले आहे.

आपल्या भागातील रुग्णांना आरोग्य सुविधा मिळाव्या यासाठी महाराष्ट्रातील धनगर समाज संघर्ष समितीच्या सर्व जिल्हाध्यक्ष व पदाधिकांयांनी आपल्या भागातील रुग्णांची आरोग्य विषयक समस्या जाणून घेवून त्याची सविस्तर माहिती भरून रुग्णांना एम्स रुग्णालयात पाठवावे व त्यांच्या आरोग्य विषयक समस्या सोडवाव्या. जेणेकरून गंभीर रुग्णांना कमी पैशात उपचार करून घेता येईल. वैद्यकीय सहाय्यता सेलच्या महाराष्ट्र प्रमुखपदी अमन कुंडगीर यांची नियुक्ती करण्यात आली असून सामाजिक कार्याची पावती म्हणून या माध्यमातून महाराष्ट्रातील रुग्णांच्या आजाराचे प्रश्न सोडवण्यासाठी व गरजु रुग्णांना मदत पुरवण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत. आरोग्य विषयक कुठलीही समस्या असेल तर मा.खा.पद्मश्री डॉ.विकास



महात्मे सोशल फाऊंडेशनच्या वैद्यकीय सहाय्यता सेलाशी रुग्णांनी पत्रव्यवहार केल्यानंतर सहाय्यता प्रमुख मदत पुरविण्यासाठी मदत करतील. रुग्णांनी पत्रव्यवहार करुन आरोग्य सुविधा मिळवून घ्याव्यात.




**किनवट : येथील गटशिक्षणाधिकारी ज्ञानोबा बने हे सेवानिवृत्त झाल्याचे त्यांचा सेवापूर्ती सोहळा मातोश्री कमलताई ठमके इंग्लिश स्कूल येथे पार पडला. यावेळी आमदार भीमराव केराम, सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्पाधिकारी कावली मेघना, भा.प्र.से., अभि.प्रशांत ठमके, सुधाकर भोयर आदीं मान्यवरांनी त्यांना सेवापूर्ती निमित्त शुभेच्छा दिल्या.**

साप्ताहिक लोकादेशचे मालक, प्रकाशक, संपादक **साजीदोद्दीन शरफोद्दीन बडगुजर** यांनी मुद्रक **शेख राजीक शेख खाजामिया** यांच्या हिंदूस्थान ऑफसेट प्रिंटींग प्रेस, हनुमान मंदिर जवळ किनवट ता.किनवट जि.नांदेड-431 804 (महा.) येथे मुद्रित करून बडगुजर भवन मोमीनपु, किनवट ता.किनवट जि.नांदेड-431 804 (महा.) येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR/2007/20732 फोन/फॅक्स नं. (02469) 221666 भ्रमणध्वनी : 09850900628 ईमेल : sajidbadgujar@gmail.com, lokadesh@gmail.com